# महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com


जावक क्र.महाज्योती/पीएचडी२०२३/ १८१९ /२०२४-२५, दि.२६.०७.२०२४

## परीपत्रक

**विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महात्मा ज्योतीबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती - २०२३ च्या छाननी प्रक्रियेकरिता मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी उपस्थित राहणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती -२०२३ करिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, आपल्या मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची तपासणी करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधीतांनी पुढे नमूद सुचनेनुसार कार्यवाही करावी.

१) दि.३१.०७.२०२४ ते दि.०७.०८.२०२४ या कालावधीत मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे. सदर कागदपत्रांची तपासणी खालीलप्रमाणे होणार आहे.

| तपासणीचा दिनांक व दिवस | तपासणीकरीता उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|
| दि.३१.०७.२०२४, बुधवार | यादी क्र. १ - अनु ०१ ते २५० | २५० विद्यार्थी |
| दि. ०१.०८.२०२४, गुरुवार | यादी क्र. २ - अनु २५१ ते ५०० | २५० विद्यार्थी |
| दि. ०२.०८.२०२४, शुक्रवार | यादी क्र. ३ - अनु ५०१ ते ७५० | २५० विद्यार्थी |
| दि. ०५.०८.२०२४, सोमवार | यादी क्र. ४ - अनु ७५१ ते १००० | २५० विद्यार्थी |
| दि. ०६.०८.२०२४, मंगळवार | यादी क्र. ५ - अनु १००१ ते १२०० | २०० विद्यार्थी |
| दि. ०७.०८.२०२४, बुधवार | यादी क्र. ६ - अनु १२०१ ते १३८१ | १८१ विद्यार्थी |

**२) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर-४४० ०२२ या पत्त्यावर ठीक सकाळी ११.०० वाजेपासून दु.०५.०० वाजेपर्यंत सोबत नमूद मुळ कागदपत्रांसहित उपस्थित रहावे व संबंधितांनी मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करुन घ्यावी.**

३) ज्या मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे त्या कागदपत्रांची यादी योबत जोडण्यात आलेली आहे तसेच अर्जाची प्रत सोबत आणावी.

४) अर्जाची प्रत व मूळ कागदपत्रांची क्रमवार झेरॉक्स स्वयं साक्षांकित करुन सादर करावी, केवळ प्रतिज्ञापत्र (मा. कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कोर्टात Affidavit करुन) मूळ प्रतीत सोबत सादर करावे. (प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडला आहे.)

५) ज्या क्रमाने यादीतील प्रमाणपत्रे/ कागदपत्रे मागविली आहेत, त्याच क्रमाने मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाखवावीत, जेणेकरुन वेळेची बचत होऊ शकेल.

६) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पळताळणी करण्याकरिता महाज्योती कार्यालयात आल्यावर आपण प्रथम नोंद करुन घेणे आवश्यक राहील, नोंदणी केलेल्या क्रमाने कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

७) कागदपत्रांची पडताळणी करतांना अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा वाद विवाद करु नये. कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा शंका असल्यास प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी भेटून आपली शंका किंवा समस्या दूर करावी.

८) आपल्या अर्जात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती असेल तर आपण ती मूळ कागदपत्रांची तपासणी करताना संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना सदर बाब निदर्शनास आणून द्यावी व दुरुस्ती करुन घ्यावी.

९) कोणतेही मूळ कागदपत्रे जमा करु नये, उमेवारांनी आपल्या मूळ कागदपत्रांची काळजी स्वत: घ्यावी, कागदपत्रे गहाळ झाल्यास महाज्योती कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१०) ज्या महिला उमेदवार गर्भवती असतील, अशा महिला उमेदवारांनी mahajyotifellowship2023@gmail.com या मेलवर अनुपस्थितीचा अर्ज डॉक्टरांच्या आवश्यक प्रमाणपत्रासह सादर करावा, अश्या उमेदवार आपल्या पालक किंवा प्रतिनिधीमार्फत मूळ कागदपत्रे पाठवून पडताळणी करुन घेण्यास हरकत नाही.

११) कागदपत्रे पडताळणी करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता/खर्च किंवा प्रवास खर्च या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

१२) **मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या तसेच तपासणीच्या दिवशी अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा अर्ज रद्द ठरविण्यात येईल, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

१३) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी झाल्यावरच विहीत नियमानुसार पात्रता व अपात्रता ठरविण्यात येईल.

१४) मा.अमुस (वित्त) यांच्या कायमस्वरुपी समितीने दिलेल्या निर्देशाचे पालन वेळोवेळी करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

आपल्या काही शंका असल्यास महाज्योतीच्या कॉल सेंटर वर कार्यालयीन वेळेत दूरध्वनीवरून संपर्क करावा.

**-स्वा-**
**(राजेश खवले)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती),महाराष्ट्र राज्य, नागपुर.**

प्रतिलिपी :-
सर्व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती 2023 चे पात्र उमेदवार

## पडताळणी करून घ्यावयाच्या कागदपत्रांची यादी

| अ क्र | सादर करावयाची मूळ कागदपत्रे |
|---|---|
| १. | महाज्योतीमध्ये नोदणी केलेल्या ONLINE अर्जाची प्रत |
| २. | उमेदवाराचे आधार कार्ड |
| ३. | Pan Card |
| ४. | उमेदवाराचा अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| ५. | उमेदवाराचा जातीचा दाखला |
| ६. | उमेदवाराचे वैध नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र |
| ७. | उमेदवाराचे १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ८. | उमेदवाराचे १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ९. | उमेदवाराचे पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १०. | उमेदवाराचे पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ११. | उमेदवाराचे NET/SET/PET परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १२. | उमेदवाराने पीएचडी करिता प्रवेश घेतल्याची पावती /पत्र |
| १३. | उमेदवारास RAC/RRC ने संशोधन प्रकल्पास दिलेल्या मान्यतेचे पत्र |
| १४. | उमेदवाराचे पीएचडीकरिता नोंदणी पक्की झाल्याचे प्रमाणपत्र (Confirmation letter) |
| १५. | RAC/RRC ने मान्यता दिलेला संशोधन सारांश (Synopsis) |
| १६. | संशोधन केंद्रात संशोधनासाठी रुजू झाल्याचे पत्र |
| १७. | दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास) |
| १८. | नावात बदल असल्यास त्याचा पुरावा (Change in Name - Gazzette) |
| १९. | B+ मानांकन प्राप्त शासकीय विद्यापीठ/A मानांकन प्राप्त खाजगी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्याबाबतचा पुरावा. |
| २०. | रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत नसल्याबाबत व इतर अधिछात्रवृत्ती मिळत नसल्याबाबत शपथपत्र. |

**-स्वा-**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती),महाराष्ट्र राज्य, नागपुर.**

**टिप – वरील मूळ कागदपत्रे याच क्रमाने लावून त्यांना पताका चिकटवावी व त्यावर कागदपत्राचे अनुक्रमांक नमूद करावेत व त्याच क्रमाने तपासणी करून घ्यावी.**